वर्ष १० वे विषेश अंक R.N.I.N.MAHMAR/2013/50939-L/230/RNP/Beed/2025-27 संपादक-अबुबकर खमर पाशा मो.९५४५३८१२२० वार-मंगळवार दि. १६ सप्टेंबर २०२५ पाने ४ किंमत ३



# अखेर अर्चना कुटे सीआयडीच्या ताब्यात

## ज्ञानराधा मल्टीस्टेटमध्ये कोट्यावधीचा घोटाळा, अनेक जिल्ह्यात गुन्हे दाखल



बीड (दिव्य न्युज):-कुटे ग्रुपच्या संचालक अर्चना कुटे यांना पुण्यातून सीआयडीच्या टीमने ताब्यात घेतले असल्याची माहिती आहे.ज्ञानराधातील हजारो कोटींच्या भ्रष्टाचार प्रकरणात त्या फरार होत्या.अखेर पुण्यातून त्यांच्या मुसक्या आवळण्यात आल्या आहेत.

छत्रपती संभाजीनगरच्या सीआयडी टीमने पुण्यातून काही वेळापूर्वी त्यांना ताब्यात घेतले असून त्यांना छत्रपती संभाजीनगर येथे आणण्यात येणार आहे.बीड जिल्ह्यासह इतर जिल्ह्यात ज्ञानराधा मल्टीस्टेटने हजारो कोटींचा भ्रष्टाचार केला होता.यामुळे अनेक ठेवीदारांनी आपले प्राण ही सोडले.सुरेश कुटे आणि कुलकर्णी यांच्या अटकेनंतर अर्चना कुटे यांना अटक करण्यात यावी अशी मागणी जोर धरत होती.अखेर हा तपास सीआयडीकडे वर्ग झाल्यानंतर कुटे ग्रुपच्या सर्वेसर्वा अर्चना कुटे यांना छत्रपती संभाजीनगरच्या पथकाने ताब्यात घेतले आहे.

# पुढील स्टेशन बीड...

## तीन पिढ्यांची स्वप्नपूर्ती; १६ स्थानके, २६१ किमी मार्ग, पहिल्या रेल्वेची उत्सूकता



Email:- dailydivyawarta@Gmail.com

# दिव्य वार्ता

Email:-editordivyawarta@gmail.com

**बीड, (दिव्य न्युज):-आपल्या गावात जसं एसटी बस स्टँड असावं अशी प्रत्येकाची इच्छा असते, तसेच आपल्या गावात रेल्वे स्टेशनही असायला पाहिजे, असे प्रत्येकाला वाटते. दळणवळणाचा महत्त्वाचं साधन आणि देशाला जोडणारा मार्ग म्हणून भारतीय रेल्वेचे जगभर ख्याती आहे. मराठवाड्यातील बीड जिल्हा या रेल्वेमार्गापासून वंचित होता. त्यामुळे, गेल्या तीन पिढ्यांपासून बीडमध्ये रेल्वेचं इंजिन धावावं, रेल्वेची शिट्टी वाजावी, रेल्वेनं बीडमध्ये उतरावं हे स्वप्न बीडकरांनी पाहिलं होतं. अखेर, हे स्वप्न सत्यात उतरत आहे.**

मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाचे औचित्य साधत उद्या अहिल्यानगर ते बीड या रेल्वे लोहमार्गावर पहिली रेल्वे धावणार आहे. त्यामुळे बीडकरांचं स्वप्नांची पूर्तता या निमित्ताने होत असल्याचा आनंद बीडसह मराठवाड्यातील प्रवाशांना आहे.

बीड जिल्ह्यात गेल्या अनेक वर्षांपासून रेल्वेची मागणी करण्यात येत होती, बीडच्या दिवंगत नेत्या आणि माजी खासदार केशर काकू क्षीरसागर यांनी बीड रेल्वेची मागणी केली होती. तर, दिवंगत भाजप नेते आणि माजी मंत्री गोपीनाथ मुंडे यांनीही यासाठी सातत्याने पाठपुरावा केला होता. मात्र, आता त्यांच्या पश्चात बीडकरांची ही मागणी आणि स्वप्न सत्यात उतरत आहे. त्यामुळे, बीडकरांची उत्सुकता शिगेला पोहोचली आहे. मात्र, बीड-पहिल्यानगर लोहमार्गावर नेमकी किती स्थानके असणार, या मार्गावर रेल्वे नेमकी कशी धावणार? हे पाहण्यासाठी अनेक जण रेल्वे स्थानकावर गर्दी करत आहेत. तर, काही शाळांकडून विद्यार्थ्यांना पहिल्या रेल्वे प्रवासाची सफर घडवत संस्मरणीय अनुभवही दिला जात आहे.

बीडच्या दिवंगत नेत्या आणि तत्कालीन खासदार केशर काकू क्षीरसागर यांनी बीडसाठी पहिल्यांदा रेल्वेची मागणी केली. स्वर्गीय अमोल गलधर यांच्यासह रेल्वे कृती समितीने आंदोलनाचा लढा उभारला. त्यानंतर दिवंगत गोपीनाथ मुंडे यांनी त्याचा पाठपुरावा केला. गोपीनाथ मुंडे यांच्या निधनानंतर माजी खासदार प्रीतम मुंडे यांनीही यासाठी पाठपुरावा केला. तर, आता विद्यमान खासदार बजरंग सोनवणे यांच्या काळात ही रेल्वे बीडमध्ये येत असून बीडकरांच्या तीन पिढ्यांची स्वप्नपूर्ती होतानाचा दिवस अखेर उजाडलाय.

# पोहरादेवी गडाचे महंत जितेंद्र महाराजांचा आमदाराला इशारा

## 'ज्या' समाजासाठी धनंजय मुंडे सरकारवर कडाडले, तोच समाज आक्रमक झाला



मुंबई, (दिव्य न्युज):- राज्य सरकारने हैदराबाद गॅझेटियरचा शासन निर्णय जारी केल्याने मराठा समाजातील नागरिकांना कुणबी म्हणजेच ओबीसी प्रमाणपत्र मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. मात्र, ज्याप्रमाणे हैदराबाद गॅझेटियरच्या आधारे मराठ्यांना ओबीसी प्रमाणपत्र दिलं, त्याचप्रमाणे बंजारा समाजालाही एसटी प्रवर्गातून आरक्षण देण्याची मागणी जोर धरत आहे. बीड, जालना, सोलापूनंतर धाराशिव जिल्ह्यातील तुळजापुरातही आज बंजारा समाजाने ठिय्या आंदोलन केले. बंजारा समाजाला हैदराबाद गॅजेटप्रमाणे एसटीत आरक्षण लागू करण्याची मागणी करत धाराशिवचे पालकमंत्री प्रताप सरनाईक यांना बंजारा समाजाकडून निवेदन देण्यात आले. दुसरीकडे बंजारा समाजाचे श्रद्धास्थान असलेल्या पोहरादेवी येथील महंतांनीही बंजारा समाजाच्या आमदारांना थेट इशारा दिला आहे. तसेच, बंजारा आणि वंजारी समाज वेगवेगळा असल्याचेही त्यांनी म्हटलं.

हैदराबाद गॅझेटियरनुसार बंजारा समाजाला आदिवासी प्रवर्गातून आरक्षण देण्यात यावे, या मागणीसाठी बंजारा समाजातील नेत्यांचा, समाज बांधवांकडून लढा सुरू करण्यात आला आहे. नुकतेच, बीडमधील सभेत आमदार धनंजय मुंडे यांनी बंजारा आणि वंजारी ▶▶ पान २ वर

### फक्त एका शब्दाने आंदोलन तापलं!

राज्यात सध्या आरक्षणावरून वाद उफाळला आहे. मराठा समाजाच्या आरक्षणासाठीचा लढा थांबताच ओबीसी समाज आक्रमक झाला आहे. तसेच ज्या पद्धतीने सरकारने हैदराबाद गॅझेट मराठ्यांसाठी लागू केलं, तसेच ते बंजारा समाज एसटी प्रवर्गातून आरक्षणासाठी लागू करावे अशी मागणी केली जात आहे. यामागणीसाठी बंजारा समाज रस्त्यावर उतरला आहे. यादरम्यान बीड शहरात बंजारा समाजाचा आरक्षण महामोर्चा काढण्यात आला यावेळी माजी मंत्री आणि आमदार धनंजय मुंडे ▶▶ पान २ वर

### धनंजय मुंडेंचा यू टर्न; जाती वेगवेगळ्या आहेत

बंजारा समाजाला एसटी प्रवर्गातून आरक्षण मिळावं यासाठी बंजारा समाजातील हजारो लोकांनी सोमवारी (१५ सप्टेंबर) बीड व जालन्यात मोर्चे काढले. बीडमधील मोर्चाला आमदार तथा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे (अजित पवार) नेते धनंजय मुंडे यांनी हजेरी लावली होती. यावेळी मुंडे यांनी भाषणही केलं. मात्र, या भाषणावेळी केलेल्या एका वक्तव्यामुळे धनंजय मुंडे यांच्यावर टीका होऊ लागली आहे. तसेच एका नव्या वादाला तोंड फुटलं आहे. बंजारा आणि वंजारी ▶▶ पान २ वर

# स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका पुन्हा लांबणीवर

## सुप्रीम कोर्टाकडून चार महिन्यांची मुदतवाढ

मुंबई, (दिव्य न्युज):- महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका पुन्हा एकदा पुढे ढकलण्यात आल्या आहेत. सुप्रीम कोर्टात आज याबाबत सुनावणी पार पडली. ३१ जानेवारी २०२६पर्यंत निवडणुका घेण्याचे आदेश कोर्टाने राज्य सरकार आणि आयोगाला दिले आहेत. मे २०२५ मध्ये कोर्टाने चार महिन्यात निवडणुका घेण्याचे आदेश दिले होते. पण सरकारने तयारी पूर्ण झाली नाही, त्यामुळे मुदतवाढीसाठी कोर्टात धाव घेतली. वेळेत निवडणुका का घेतल्या नाहीत, म्हणत कोर्टाने आयोगाला आणि सरकारला खडसावले. सप्टेंबर २०२५ पर्यंत निवडणुका का घेतल्या नाहीत? असा सवाल विचारला. त्यावर राज्य सरकारकडून कोर्टात उत्तर देताना कारणांचा पाढा वाचण्यात ▶▶ पान २ वर



# कपिलधार येथे भुस्खलनाचा धोका, उपाययोजना कराव्यात-क्षीरसागर

बीड,(दिव्य न्युज):- बीड तालुक्यातील कपिलधार येथे भुस्खलनाचा धोका निर्माण झाला असून ग्रामस्थांच्या सुरक्षिततेसाठी उपाययोजना करण्याची मागणी आ. संदीप क्षीररसागर यांनी केली आहे.



बीड विधानसभा क्षेत्रातील मौजे कपिलधार ग्रामपंचायत पाली अंतर्गत येत आहे. सदरील गाव हे डोंगराच्या कुशीत वसलेले आहे. तसेच त्याच्या बाजूला कपिलधार हे तीर्थक्षेत्र हे ठिकाण आहे. याठिकाणी हजारो भाविक भक्त दर्शनासाठी येत असतात.मात्र या ठिकाणी भुस्खलनाचा धोका निर्माण ▶▶ पान २ वर

# ऐतिहासिक दसरा महोत्सवाचे उद्घाटन करणार मुस्लिम महिला

## हायकोर्टाकडून शिक्कामोर्तब



मुंबई , (दिव्य न्युज):- म्हैसूरमधील ऐतिहासिक दसरा महोत्सव यंदा वादाच्या भोवऱ्यात अडकला आहे. या महोत्सवाचे उद्घाटन प्रसिध्द लेखिका बानू मुश्ताक यांच्या हस्ते करण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. त्यावरून कर्नाटकातील राजकारण चांगलेच ▶▶ पान २ वर

# मराठवाडा विरोधी सरकारकडून घोषणांचा पाऊस, पण अंमलबजावणीचा दुष्काळ

मुंबई , (दिव्य न्युज):- मराठवाडा मुक्तीसंग्राम दिनी छत्रपती संभाजीनगरमध्ये मंत्रिमंडळाची बैठक घेण्याची प्रथा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सरकाराने मोडीत काढली आहे. हे सरकार मराठवाड्यातील जनतेच्या विरोधातले आहे, केवळ घोषणांचा पाऊस आणि अंमलबजावणीचा दुष्काळ, अशीच सध्याची परिस्थिती असल्याचा संताप शिवसेना नेते अंबादास दानवे यांनी व्यक्त केला.



मराठवाड्याचा अनुशेष भरून काढण्यासाठी स्थापन झालेले मराठवाडा वैधानिक विकास महामंडळ अस्तित्वात नाही, सरकारकडून हजारो कोटींच्या निधीची नुसती घोषणा केली जाते, प्रत्यक्षात निधी दिला जात नाही. नैसर्गीक संकटात मराठवाड्याला वाऱ्यावर सोडले जाते. सातत्याने मराठवाड्यावर अन्याय केला जात असल्याची भावना या भागातील नागरिकांची झाली आहे. मंत्रिमंडळ बैठकीच्या निमित्ताने किमान याची चर्चा ▶▶ पान २ वर

# निजाम म्हणजे काय ? कोण होते हैदराबादचे निजाम

## हैदराबाद संस्थान : भारताच्या इतिहासातील एक आगळा वेगळा अध्याय

## स्वतंत्र राहण्याच्या हट्टामुळे निजामशाहीचा अंत

निजाम  हा शब्द अरबीतील निझाम या शब्दापासून आला असून त्याचा अर्थ व्यवस्था, प्रणाली किंवा शासन असा होतो. इतिहासात भारतात हा किताब हैदराबादच्या शासकांसाठी प्रसिद्ध झाला (१७२४–१९४८). त्यांचा संपूर्ण किताब निजाम–उल–मुल्क असा होता, ज्याचा अर्थ राज्याचा प्रशासक असा होतो.

पहिले निजाम मीर कमर–उद–दिन खान आसफ जाह पहिला होते. १७२४ मध्ये मुघल साम्राज्य दुर्बल झाल्यानंतर त्यांनी आसफ जाही वंशाची स्थापना केली.हैदराबादचे निजाम हे भारतातील सर्वात श्रीमंत आणि प्रभावी संस्थानिक शासक होते. हैदराबाद हे सर्वात मोठे संस्थान होते. शेवटचे शासक होते मीर उस्मान अली खान, आसफ जाह सातवा, ज्यांचे राज्य १९४८ पर्यंत टिकले. त्याच वर्षी ऑपरेशन पोलो अंतर्गत हैदराबाद भारतात विलीन झाले.

**पहिले निजाम  :– मीर कमर–उद–दीन खान आसफ जाह पहिला**

जन्म : २० ऑगस्ट १६७१
मृत्यू : २१ मे १७४८
मुळचे : उत्तर भारतातील समाना (आजचे हरियाणा-पंजाब सीमेवर).
त्यांचे वडील : मीर शाहाबुद्दीन (मुघल दरबारात सरदार).

कारकीर्द :– सुरुवातीला मुघल सम्राट औरंगजेबकडे लष्करी सेवा बजावली. औरंगजेबाच्या मृत्यूनंतर दिल्ली दरबारात राजकीय गोंधळ सुरू झाला. १७२४ मध्ये दक्षिणेत स्वबळावर सत्ता प्रस्थापित करून निजामशाहीची (आसफ जाह वंशाची) पायाभरणी केली.त्यांना मुघल बादशहा मोहम्मद शाहाने निजाम–उल–मुल्क आसफ जाह हा किताब दिला.पहिल्या निजामाने निजामशाहीत मजबूत प्रशासकीय व लष्करी व्यवस्था उभी केली. तसेच हैदराबाद राज्याची भक्कम पायाभरणी केली आणि मृत्यूपर्यंत (१७४८) सुमारे २४ वर्षे निजाम म्हणून राज्य केले.म्हणजेच, पहिला निजाम – मीर कमर–उद–दीन खान आसफ जाह पहिला यानेच मुघल साम्राज्यापासून स्वतंत्र होऊन निजामशाहीची सुरुवात केली.

**दुसरे निजाम :–निजाम अली खान, आसफ जाह दुसरे**

खरे नाव : निजाम अली खान
जन्म : २४ फेब्रुवारी १७३४
मृत्यू : ६ ऑगस्ट १८०३
राज्यकाल : १७६२ – १८०३ (सुमारे ४१ वर्षे)

राजकीय पार्श्वभूमी : निजाम अली खान हे आसफ जाह पहिल्याचे धाकटे पुत्र होते. १७६२ मध्ये त्यांनी आपला भाऊ सलाबत जंग याला हटवून निजामपद मिळवले.

त्यांच्या काळात निजामशाहीला मराठ्यांशी, मुघलांशी व इंग्रजांशी संघर्ष करावा लागला.

महत्वाच्या घटना :

१. मराठ्यांशी संघर्ष – निजाम अली खानच्या काळात मराठ्यांशी अनेक लढाया झाल्या (उदा. उरळी कांचन, खरद).२. खर्डा युद्ध (१७९५) – मराठ्यांनी निजामाला पराभूत केले. या युद्धात निजामला मोठा पराभव पत्करावा लागला आणि नुकसानभरपाई द्यावी लागली.३. इंग्रजांशी मैत्री – खर्डा पराभवानंतर निजामाने ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीशी घनिष्ठ संबंध ठेवले. त्यांनी इंग्रजांना सैनिकी तळ ठेवण्यास परवानगी दिली.इंग्रजांवर अवलंबून राहिल्यामुळे निजामशाही टिकून राहिली.

वैशिष्ट्ये :–निजाम अली खान हे दीर्घकाळ राज्य करणारे शासक होते. त्यांच्या काळात निजामशाहीला आर्थिक व लष्करी संकटांचा सामना करावा लागला. मराठ्यांच्या बळामुळे व नंतर इंग्रजांच्या प्रभावामुळे निजामशाहीचे स्वतंत्र अस्तित्व कमी झाले.  म्हणजेच, दुसरे निजाम – निजाम अली खान (आसफ जाह खख) यांनी ४१ वर्षे कारकीर्द केली, पण त्यांच्या काळात निजामशाहीला मराठ्यांकडून पराभव आणि इंग्रजांवर अवलंबित्व हे दोन महत्त्वाचे टप्पे अनुभवावे लागले.

**तीसरे निजाम  :–सिकंदर जाह, आसफ जाह तिसरे**

खरे नाव : मीर अकबर अली खान
जन्म : ११ नोव्हेंबर १७६८
मृत्यू : २१ मे १८२९
राज्यकाल : १८०३ – १८२९ (सुमारे २६ वर्षे)
पूर्वसुरी : निजाम अली खान, आसफ जाह दुसरे (त्यांचे वडील)

कारकीर्द व घटना :

१. ब्रिटिशांशी करार – सिकंदर जाह यांनी इंग्रज ईस्ट इंडिया कंपनीशी पूर्वीचे करार टिकवले. निजामशाही सैन्य इंग्रजांच्या ताब्यात मोठ्या प्रमाणावर ठेवण्यात आले.त्यामुळे निजाम इंग्रजांवर अधिक अवलंबून झाले.

२. आर्थिक अडचणी –लष्कराच्या देखभालीसाठी मोठा खर्च व्हायचा.इंग्रज सैन्य ठेवण्यासाठी निजामाला मोठ्या प्रमाणात आर्थिक मदत करावी लागत होती.

३. प्रशासन –त्यांच्या काळात हैदराबादमध्ये काही सुधारणा करण्यात आल्या.इंग्रज अधिकाऱ्यांचा हस्तक्षेप वाढला.

४. संरक्षण करार –१८०० च्या दशकात हैदराबाद ब्रिटिशांचा महत्त्वाचा सहयोगी बनला. निजामशाही ब्रिटिशांच्या संरक्षणाखाली गेली.

वैशिष्ट्ये :–सिकंदर जाह हे पहिले असे निजाम मानले जातात ज्यांच्या काळात निजामशाही पूर्णपणे इंग्रजांच्या प्रभावाखाली आली. त्यांनी हैदराबादचे स्वतंत्र राजकारण फारसे टिकवू शकले नाहीत. मात्र त्यांच्या कारकीर्दीत हैदराबाद हे ब्रिटिशांसाठी दक्षिण भारतातील प्रमुख सहयोगी केंद्र बनले. म्हणजेच, तिसरे निजाम – सिकंदर जाह (आसफ जाह तिसरे) यांच्या काळात निजामशाही इंग्रजांच्या संरक्षणाखाली गेली आणि इंग्रज वसाहतवादी प्रभाव हैदराबादात दृढपणे बसला.



**चौथे निजाम – नसीर–उद–दौलाह, आसफ जाह चौथे**

मूलभूत माहिती
पूर्ण नाव : मीर फिरोजुद्दीन खान सिद्दीकी, आसफ जाह चौथा
जन्म : २५ एप्रिल १७९४
मृत्यू : १६ मे १८५७
राज्यकाल : १८२९ – १८५७ (सुमारे २८ वर्षे
पूर्वसुरी : सिकंदर जाह (आसफ जाह तिसरे, त्यांचे वडील)

कारकीर्द व महत्वाच्या घटना

१. इंग्रजांशी करार : नसीर–उद–दौलाह यांचा कारकीर्दीत हैदराबाद ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीवर आणखीन अवलंबून झाला. १८५३ मध्ये त्यांनी ब्रिटिशांशी नवा करार केला, ज्यामुळे निजामाने मोठ्या प्रमाणावर जमीन (बेरार प्रांत) ब्रिटिशांच्या हवाली केली.

२. आर्थिक अडचणी
निजामशाहीत कर्जाचा डोंगर वाढला. इंग्रजांच्या सैन्याला पगार आणि देखभालीसाठी भरपूर रक्कम द्यावी लागत होती.

३. प्रशासन
त्यांच्या काळात इंग्रज अधिकारी थेट हैदराबादच्या वित्तीय आणि लष्करी बाबींमध्ये हस्तक्षेप करू लागले. त्यामुळे निजामशाहीचे स्वातंत्र्य फारच मर्यादित झाले.४. सामाजिक आणि सांस्कृतिक कार्य : त्यांच्या कारकीर्दीत हैदराबादमध्ये काही शैक्षणिक आणि सांस्कृतिक उपक्रम सुरू झाले. दरबारात उर्दू आणि फारसी साहित्याला प्रोत्साहन दिले गेले.

वैशिष्ट्ये : चौथ्या निजामाच्या काळात निजामशाही जवळजवळ ब्रिटिशांच्या नियंत्रणाखाली आली. बेरारसारखा समृद्ध प्रदेश इंग्रजांकडे गेला, त्यामुळे निजामशाहीची आर्थिक स्थिती अधिकच खालावली. हा कालखंड हैदराबादच्या राजकीय स्वातंत्र्याच्या ऱ्हासाचा निर्णायक टप्पा मानला जातो. म्हणजेच, नसीर–उद–दौलाह (आसफ जाह खत) यांनी १८२९ ते १८५७ या काळात राज्य केले आणि त्यांच्या राज्यकाळात निजामशाही इंग्रजांच्या आर्थिक व राजकीय जोखडाखाली अडकली.

**पाचवे निजाम – :अफजल–उद–दौलाह, आसफ जाह पाचवे**

मूलभूत माहिती
पूर्ण नाव : मीर तुर्कुश जहां सिद्दीकी, आसफ जाह पाचवे
जन्म : ११ ऑक्टोबर १८२७
मृत्यू : २६ फेब्रुवारी १८६९
राज्यकाल : १८५७ – १८६९ (१२ वर्षे)
पूर्वसुरी : नसीर–उद–दौलाह (आसफ जाह चौथे, त्यांचे वडील)

कारकीर्द व महत्वाच्या घटना

१. १८५७ चे स्वातंत्र्यसमर (भारतीय बंड)
अफजल–उद–दौलाह यांच्या कारकीर्दीत भारतात १८५७ चे बंड झाले.

२. आर्थिक सुधारणा
त्यांच्या कारकीर्दीत काही वित्तीय सुधारणा करण्यात आल्या. पण ब्रिटिश सैन्याच्या खर्चामुळे निजामशाही सतत कर्जबाजारी राहिली.

३. प्रशासन
इंग्रज रेसिडेंटचा प्रभाव अधिक वाढला. निजाम स्वतः सांस्कृतिक व धार्मिक कार्यात रस घेत असे, पण राज्यातील प्रत्यक्ष सत्ता इंग्रजांच्या हातातच जास्त होती.

४. सांस्कृतिक कार्य
उर्दू, फारसी व दखनी संस्कृतीचा दरबारात प्रसार झाला.काही इमारती व दर्गे यांची उभारणी झाली.

**सहावे निजाम – :मीर महबूब अली पाशा, आसफ जाह सहावे**

मूलभूत माहिती:
पूर्ण नाव : मीर महबूब अली खान सिद्दीकी बहादुर
जन्म : १७ ऑगस्ट १८६६
मृत्यू : २९ ऑगस्ट १९११
राज्यकाल : १८६९ – १९११ (सुमारे ४२ वर्षे)
पूर्वसुरी : आफजल–उद–दौलाह (आसफ जाह पाचवे, त्यांचे वडील)

मीर महबूब अली खान यांचे गादीवर बसताना वय फक्त तीन वर्षांचे होते. त्यामुळे सुरुवातीला इंग्रजांच्या देखरेखीखाली रीजेंसी कौन्सिलमार्फत राज्यकारभार चालवला गेला.



१. प्रशासनिक सुधारणा–निजाम महबूब अली पाशा हे प्रजेतील लोकप्रिय शासक होते. त्यांनी पोलीस, न्यायव्यवस्था, महसूल या क्षेत्रात सुधारणा घडवून आणल्या. हैदराबादमध्ये आधुनिक रुग्णालये, शाळा आणि सार्वजनिक सोयी उभारल्या.

२. सामाजिक कार्य–ते प्रजेतील दुःख समजून घेणारे, साधेपणाने वावरणारे शासक म्हणून ओळखले जात. ते गरीबांचा दोस्त म्हणून प्रसिद्ध होते.

३. सांस्कृतिक व औद्योगिक प्रगती– उर्दू साहित्य, संगीत, काव्य आणि स्थापत्यकलेला आश्रय दिला. रेल्वे व टपालसेवा हैदराबादमध्ये वाढली.

वैशिष्ट्ये: मीर महबूब अली पाशा हे लोकप्रिय, परोपकारी आणि सुधारणावादी निजाम म्हणून ओळखले जातात. त्यांच्या कारकीर्दीत हैदराबाद एक समृद्ध आणि सांस्कृतिकदृष्ट्या प्रगत संस्थान म्हणून उभे राहिले. त्यांच्या मृत्यूनंतर त्यांचा मुलगा मीर उस्मान अली खान (आसफ जाह सातवे) गादीवर आला, जो शेवटचा निजाम ठरला.म्हणजेच, सहावे निजाम – मीर महबूब अली पाशा (आसफ जाह तख) यांनी ४२ वर्षे राज्य केले आणि ते गरीबांचा दोस्त म्हणून प्रजेच्या मनात आजही जिवंत आहेत.

**सातवे व शेवटचे निजाम –: मीर उस्मान अली खान, आसफ जाह सातवे**

मूलभूत माहिती
पूर्ण नाव : मीर उस्मान अली खान सिद्दीकी बहादुर
जन्म : ६ एप्रिल १८८६
मृत्यू : २४ फेब्रुवारी १९६७
राज्यकाल : १९११ – १९४८ (३७ वर्षे)
पूर्वसुरी : मीर महबूब अली पाशा (आसफ जाह सहावे, त्यांचे वडील) हे हैदराबादचे शेवटचे शासक होते.

कारकीर्द व महत्वाच्या घटना– १. अत्यंत संपन्न शासक–मीर उस्मान अली खान यांना त्या काळी जगातील सर्वात श्रीमंत व्यक्ती म्हटले जात असे.त्यांच्या खजिन्यात कोहिनूरसारखे हिरे, असंख्य मौल्यवान दागिने आणि प्रचंड संपत्ती होती.

२. आधुनिक सुधारणा–शिक्षण, आरोग्य, शेती, उद्योग या क्षेत्रात मोठ्या प्रमाणात सुधारणा घडवून आणल्या.उस्मानिया विद्यापीठ (१९१८), उस्मानिया हॉस्पिटल, न्यायालये, धरणे व इतर सार्वजनिक संस्था त्यांच्या कारकीर्दीत उभारल्या गेल्या. उर्दूला प्रशासकीय भाषा म्हणून मान्यता दिली.

३. भारताच्या स्वातंत्र्यानंतर (१९४७)–१९४७ मध्ये भारत स्वतंत्र झाल्यानंतर निजामाने हैदराबाद संस्थान स्वतंत्र ठेवण्याचा प्रयत्न केला.पण १९४८ मध्ये ऑपरेशन पोलो अंतर्गत भारतीय सैन्याने हैदराबाद भारतात विलीन करून घेतले. त्यानंतर निजामाला राजप्रमुख म्हणून काही काळ मान्यता मिळाली, पण त्यांचे सार्वभौम राजकारण संपुष्टात आले.

४. नंतरचे जीवन
गादीवरून खाली आल्यानंतर निजामाने साधे जीवन व्यतीत केले. ते शैक्षणिक, सामाजिक व धार्मिक संस्थांना मोठ्या प्रमाणात दान देत राहिले.

वैशिष्ट्ये : मीर उस्मान अली खान हे हैदराबादचे शेवटचे व सर्वात प्रसिद्ध निजाम होते. त्यांच्या कारकीर्दीत निजामशाहीचा अंत झाला आणि हैदराबाद भारताचा भाग बनला. म्हणजेच, सातवे निजाम – मीर उस्मान अली खान (आसफ जाह तखख) हे शेवटचे निजाम ठरले आणि १९४८ मध्ये त्यांच्या कारकीर्दीत निजामशाहीचा इतिहास संपला.इथे आसफ जाह वंशातील सर्व सात निजामांची वंशावळ दिली आहे :

आसफ जाह वंश (निजामशाही, हैदराबाद)

| क्रमांक | निजामाचे नाव | किताब (–रिष गरह) | जन्म – मृत्यू | राज्यकाल | वैशिष्ट्ये |
|---|---|---|---|---|---|
| १ | मीर कमर–उद–दीन खान | आसफ जाह ख | १६७१ – १७४८ | १७२४ – १७४८ | निजामशाहीची पायाभरणी केली, मुघल साम्राज्यापासून स्वतंत्र सत्ता उभी केली. |
| २ | निजाम अली खान | आसफ जाह खख | १७३४ – १८०३ | १७६२ – १८०३ | मराठ्यांशी अनेक लढाया; खर्डा युद्धात पराभव; इंग्रजांशी मैत्री केली. |
| ३ | सिकंदर जाह | आसफ जाह खखख | १७६८ – १८२९ | १८०३ – १८२९ | निजामशाही पूर्णपणे इंग्रजांच्या प्रभावाखाली गेली. |
| ४ | नसीर–उद–दौलाह | आसफ जाह खत | १७९४ – १८५७ | १८२९ – १८५७ | आर्थिक संकट; १८५३ ला बेरार प्रांत इंग्रजांकडे गेला. |
| ५ | आफजल–उद–दौलाह | आसफ जाह त | १८२७ – १८६९ | १८५७ – १८६९ | १८५७ च्या बंडात इंग्रजांना साथ दिली; इंग्रजांवरील अवलंबित्व वाढले. |
| ६ | मीर महबूब अली पाशा | आसफ जाह तख | १८६६ – १९११ | १८६९ – १९११ | लोकप्रिय व सुधारणावादी शासक; गरीबांचा दोस्त म्हणून प्रसिद्ध. |





निजामशाहीचा ऐतिहासिक प्रवास (१७२४ – १९४८)९ सुरुवात : आसफ जाह पहिला (१७२४)मुघल साम्राज्य ढासळत असताना मीर कमर–उद–दीन खान यांनी १७२४ मध्ये दक्षिणेत स्वतःची स्वतंत्र सत्ता उभी केली. त्यांना निजाम–उल–मुल्क आसफ जाह हा किताब मिळाला आणि अशाप्रकारे हैदराबाद निजामशाहीची सुरुवात झाली.

९ विस्तार आणि संघर्ष (१८ वे शतक)
निजाम अली खान (आसफ जाह खख) यांच्या काळात निजामशाहीला सर्वाधिक आव्हाने आली. मराठ्यांशी झालेल्या खर्डा युद्धात (१७९५) निजामाला पराभव पत्करावा लागला. या पराभवानंतर निजाम इंग्रजांच्या अधिक जवळ गेला आणि हळूहळू निजामशाही इंग्रजांच्या संरक्षणाखाली गेली.

९ इंग्रजांवर अवलंबित्व (१९ वे शतक)
सिकंदर जाह (आसफ जाह खखख) आणि नसीर–उद–दौलाह (आसफ जाह खत) यांच्या काळात इंग्रज रेसिडेंटचा हस्तक्षेप वाढत गेला. १८५३ मध्ये बेरार प्रांत इंग्रजांना देण्यात आला. आफजल–उद–दौलाह (आसफ जाह त) यांनी १८५७ च्या बंडात इंग्रजांना साथ दिली, त्यामुळे निजामशाही टिकून राहिली पण स्वातंत्र्य जवळजवळ संपले.

९ सुधारणांचा काळ (१९ वे – २० वे शतक)
मीर महबूब अली पाशा (आसफ जाह तख) हे गरीबांचा दोस्त म्हणून ओळखले गेले. त्यांनी शिक्षण, आरोग्य व प्रशासनात सुधारणा केल्या. हैदराबादला आधुनिकतेकडे नेण्याचा प्रयत्न झाला.

९ शेवटचा निजाम (१९११ – १९४८) :
मीर उस्मान अली खान (आसफ जाह तखख) जगातील सर्वात श्रीमंत शासक होते . त्यांच्या काळात उस्मानिया विद्यापीठ, हॉस्पिटल्स, न्यायालये उभारली गेली. निजामच्या दरबारात अनेक हिंदू व मुस्लिमेतर अधिकारी होते .निजामाचे पंतप्रधान सुद्धा हिंदू होऊन गेलेले आहेत.या बरोबरच त्यांच्यावर अनेक आक्षेप ही आहेत. शेवटचा निजाम आपल्या काही हरकतींमुळे वादग्रस्त ठरला.तसेच १९४७ मध्ये भारत स्वतंत्र झाल्यानंतर निजामाने स्वतंत्र राहण्याचा प्रयत्न केला.भारतीय सरकारने ऑपरेशन पोलो (१९४८) राबवून हैदराबाद भारतात विलीन केले आणि निजामशाहीचा इतिहास संपला.

---

पान १ वरून

## पोहरादेवी गडाच्या

बंजारा समाजाला आदिवासी प्रवर्गातून आरक्षण द्यावे, असे जाहीर वक्तव्य केले होते. धनंजय मुंडेंच्या या वक्तव्यावरुन वाद निर्माण झाला असून बंजारा समाजाचे नेते पुढे येऊन दोन्ही समाज आरक्षणाच्या दृष्टीतून वेगळे असल्याचं सांगत आहेत. माजी खासदार हरिभाऊ राठोड यांनी आपली भूमिका मांडल्यानंतर आता बंजारा समाजाचे तीर्थस्थान असलेल्या पोहरादेवी येथील महंत जितेंद्र महाराज यांनीही आपली भूमिका मांडली आहे.

धनंजय मुंडेंनी केलेल्या वक्तव्यावर पोहरादेवी येथील महंत जितेंद्र महाराज यांनी बोलताना बंजारा आणि वंजारी एक नसल्याचे म्हटले. बंजारा समाज आहे. तर, वंजारी हा समाज आहे. आरक्षणाच्या दृष्टिकोनातून दोन्ही समाजाला वेगवेगळे आरक्षण आहे. मराठवाड्यात बंजारा समाज हे गुण्यागोविंदाने नांदत आहेत. धनंजय मुंडे यांनी आपलं मत व्यक्त केलं, पण आरक्षणाच्या दृष्टिकोनातून हे दोन्ही समाज वेगळे आहेत, असे जितेंद्र महाराज यांनी म्हटले. बंजारा समाज आदिवासी प्रवर्गात बसत असेल तर निश्चितच त्यांना आरक्षण देण्यात यावं, अशी भूमिका आमची राहील. तसेच राज्यात ५ आमदार बंजारा समाजाचे आहेत, सोबतच ४० मतदार संघामध्ये बंजारा समाज बहुल आहे. त्यामुळे येथील आमदारांनी सुद्धा बंजारा समाजाच्या या मागणीसाठी पाठिंबा द्यावा. अन्यथा धर्मपिठावरुन त्यांच्याविरोधात आदेश काढण्याचाही भूमिका घेण्यात येईल, असा इशाराही महंत जितेंद्र महाराजांनी बंजारा समाजाच्या आमदारांना दिला आहे.

दरम्यान, आपल्या वक्तव्यावर धनंजय मुंडेंनी स्पष्टीकरण दिलं आहे. कोणी काय विरोध करावा, हे माझ्या हातात नाही. स्थानिक पातळीवर आम्ही कशा पद्धतीने राहतो आणि आम्ही बोलताना आणि वागताना, वंजारा आणि बंजारा ही जात वेगळी आहे, बाकी सगळ्या गोष्टी वेगळ्या आहेत. स्वर्गीय गोपीनाथ मुंडे साहेबांपासून, बंजारा समाजाने मुंडे साहेबांवर प्रेम केले आहे. त्या परिस्थितीत मी ते बोललो आहे. त्या बोलण्याचा कोणी काय अर्थ घ्यावा. अर्थ घेणारे आणि घोषणा देणारे कोण होते, हे सुद्धा सोशल मीडियावर समोर आले आहे. कुठेतरी चांगल्या कार्यक्रमाला गालबोट लागावं, काहीतरी झालं पाहिजे ना, अशी काही विघ्नसंतोषी लोकं आहेत, ते हे सगळे प्रकार करत आहेत, असे धनंजय मुंडे यांनी म्हटले.

## फक्त एका शब्दाने

यांनी सहभाग घेतला. त्यांनी, बंजारा समाजाला आरक्षण मिळालेच पाहिजे अशी ठाम भूमिका घेतली. मात्र आता हाच समाज मुंडे यांच्याविरोधात आक्रमक झाला आहे. बंजारा समाजाने मुंडे यांनी आपली भूमिका स्पष्ट करावी अशी मागणी केली आहे. यामुळे बीडमध्ये खळबळ उडाली आहे.

मराठा समाजाला ओबीसीचे आरक्षण देण्यासाठी राज्य सरकारने हैदराबाद गॅझेट लागू करण्याचा निर्णय घेतला आहे. यामुळे गॅझेट मधील नोंदीच्या आधारामुळे मराठा समाजातील अनेकांना कुणबी दाखला (ओबीसी) मिळणार आहे. यामुळे आता ओबीसी समाजाचे आरक्षण धोक्यात आल्याचा आरोप ओबीसी नेत्यांकडून होत आहे. यामुळेच राज्यातील वातावरण तापले आहे.

याच मुद्द्यावरून बंजारा समाज देखील आता आरक्षणासाठी आक्रमक झाला आहे. हैदराबाद गॅझेटमधील नोंदीवरून एसटी प्रवर्गाचे आरक्षण दिले जावे अशी मागणी केली आहे. याच मागणीसाठी आज बीडमध्ये भव्य मोर्चा काढण्यात आला. यावेळी या विराट मोर्चात मुंडे यांनी सहभाग घेतला. त्यांनी व्यासपीठावर जावून भाषण केले. त्यांनी बंजारा–गोरमाटी समाजाला एसटीचे आरक्षण मिळवून दिल्याशिवाय हा लढा थांबणार नाही आणि या लढ्यात मी शेवटपर्यंत तुमच्या सोबत राहील, अशी ग्वाही दिली.

मात्र याचवेळी त्यांनी वंजारा आणि बंजारा समाज एकच असल्याचे म्हटले. यावरून आता नवा वाद सुरू झाला आहे. या वक्तव्यानंतर बंजारा समाज आक्रमक झाला असून मुंडे यांनी आपली नेमकी भूमिका काय ती स्पष्ट करावी, अशी मागणी केली आहे. तर मुंडे यांचे भाषण सुरू असतानाच बंजारा समाजाने जोरदार घोषणाबाजी करत वंजारा आणि बंजारा एक नाही, अशी घोषणाबाजी केली. बंजारा समाज आणि वंजारा समाज एक नसून माजी मंत्री धनंजय मुंडे यांनी याबाबत स्पष्ट भूमिका करावी. समाज त्यांचा निषेध व्यक्त करतो, असेही समाजाने म्हटलं आहे. तर बंजारा समाजाचे नेते हरिभाऊ राठोड यांनीही मुंडेंच वक्तव्य चुकीचं असल्याचं म्हटलं आहे.

## धनंजय मुंडेंचा यू टर्न ;

वेगळे आहेत का? असा प्रश्न मुंडे यांनी भाषणातून उपस्थित केला होता.मुंडे यांच्या या वक्तव्यावर बंजारा समाजातील अनेकांनी आक्षेप नोंदवला असून मुंडे यांना त्यांचे शब्द मागे घ्यावेत अशी मागणी केली आहे. तसेच मुंडे यांचं भाषण चालू असतानाच बंजारा समाजातील मोर्चेकऱ्यांनी विरोध केला. धनंजय मुंडेंविरोधात घोषणा देखील दिल्या.दरम्यान, वंजारी व बंजारा या जाती वेगळ्या आहेत असं म्हणत धनंजय मुंडे यांनी कालच्या वक्तव्यावरून यू-टर्न घेतला आहे. बंजारा समाजाने भाजपाचे दिवंगत नेते गोपीनाथ मुंडे यांच्यावर खूप प्रेम केलं आहे. त्याच भावनेतून मी ते वक्तव्य केलं होतं, असं स्पष्टीकरण धनंजय मुंडे यांनी दिलं आहे. तसेच दोन्ही जाती वेगवेगळ्या आहेत अशी भूमिकाही त्यांनी मांडली.

बंजारा व वंजारी या जाती म्हणून वेगवेगळ्या आहेत. बाकी सगळ्या गोष्टी वेगळ्या आहेत. गोपीनाथ मुंडे हयात असताना बंजारा समाजाने त्यांच्यावर खूप प्रेम केलं. त्या परिस्थितीत मी ते वक्तव्य केलं. आता त्याचा कोणी काय अर्थ घ्यावा तो ज्याचा त्याचा प्रश्न. घोषणा देणारे कोण होते ते समाजमाध्यमांद्वारे बाहेर आलंच आहे. त्यामुळे मी त्यावर काही बोलणार नाही.धनंजय मुंडे बीडमधील भाषणात म्हणाले होते की बंजारा समाजाला तेलंगणात एसटी (अनुसूचित जमाती) प्रवर्गात आरक्षण दिलं आहे. राजस्थानातही एसटी प्रवर्गात आरक्षण देण्यात आलं आहे. विशेष म्हणजे आम्हीसुद्धा राजस्थानात एसटीच आहोत. त्यामुळे बंजारा-वंजारी वेगळे आहेत का?

## स्थानिक स्वराज्य

आला. कोर्टात नेमकं काय काय झालं? याबाबत जाणून घेऊयात..

न्यायमूर्ती सूर्यकांत आणि जॉयमाला बागची यांच्या खंडपीठासमोर सुनावणी पार पडली. यावेळी न्यायमुर्ती सुर्यकांत यांनी राज्य सरकारच्या वकिलांना प्रश्न विचारला, 'निवडणुका झाल्या आहेत का? मे महिन्यात आदेश दिला होता, चार महिन्यांत (सप्टेंबर अखेरीस) निवडणुका होणे अपेक्षित होतं. का झाल्या नाहीत?' असा सवाल त्यांनी उपस्थित केला.राज्य सरकारच्या वकीलांनी यावर उत्तर दिलं. 'प्रक्रिया सुरू आहे... सीमांकन पूर्ण झाले आहे... राज्य निवडणूक आयोगाला काही मुदतवाढ हवी आहे. अंतरिम अर्ज दाखल केला आहे', असं ते म्हणाले. यावेळी राज्य सरकारच्या वकिलांनी दाखल झालेल्या याचिकेनुसार जानेवारी २०२६ पर्यंत मुदतवाढ मागितली होती.

न्यायमुर्ती सुर्यकांत यांनी, 'आम्ही जानेवारीपर्यंत मुदतवाढ का द्यावी ?', असा सवाल उपस्थित केला. यावर राज्य सरकारच्या वकिलांनी, '२९ महानगरपालिका आहेत. प्रथमच निवडणुका एकाचवेळी होत आहेत', असं उत्तर दिलं. नंतर न्यायमुर्ती सुर्यकांत यांनी वकिलांकडे निवडणुका पुढे ढकलण्याबाबत कारणे विचारले. यावेळी राज्य सरकारच्या वकिलांनी 'आमच्याकडे ६५ हजार ईव्हीएम मशिन्स आहेत, आणखी ५० हजार हव्या आहेत. आम्ही ऑर्डर दिल्या आहेत', असं न्यायमुर्तींना सांगितलं.यावर न्यायमुर्ती सुर्यकांत यांनी राज्य सरकारच्या वकिलांना, 'आम्ही पहिला आदेश दिला तेव्हाही तुम्हाला हे माहित होतं', असं म्हणत खडसावलं. यावेळी वकिलांनी, '२ आठवड्यांच्या आत, त्यांना सूचित करावे लागले. ते आता सर्वकाही नव्याने करत आहेत. अनेक प्रकरणांमध्ये सीमांकन देखील अंतिम झालेले नाही. याला कारणे म्हणजे सण, बोर्ड परीक्षा, कर्मचारी आणि ईव्हीएम उपलब्ध नसणे. मतदान केंद्रांवर रिटर्निंग अधिकाऱ्यांची आवश्यकता आहे' असे राज्य सरकारच्यावतीनं वकिलांनी न्यायमुर्तींसमोर कारणे उपस्थित केले.

सुप्रीम कोर्टानं आदेशात म्हटलं की, 'महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांशी संबंधित वाद आहे. ओबीसींच्या आरक्षणाबाबत वाद निर्माण झाल्यामुळे प्रामुख्याने निवडणुका घेता आल्या नाहीत. बांठिया आयोगाच्या अहवालावर आधारित वाढीव आरक्षणाची वैधता आव्हानात्मक आहे. या पार्श्वभूमीवर ६ मे रोजी न्यायालयाने खालील निर्देशांसह एक तर्कसंगत आदेश दिला. निवडणुका ४ महिन्यांच्या आत म्हणजेच या महिन्याच्या अखेरीस पूर्ण होणे अपेक्षित होतं. आम्हाला वकिलांनी कळवले आहे की निवडणुका अद्याप अधिसूचित झालेल्या नाहीत'.एका प्रश्नावर राज्य निवडणूक आयोगाच्या वकिलांनी माहिती दिली की, 'जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांसाठी सीमांकन प्रक्रिया पूर्ण झाली आहे. नगरपालिकांसाठी सीमांकन अजूनही सुरू आहे. राज्य निवडणूक आयोगाने. इतर कारणांसह वेळ वाढवण्याची मागणी करणारा अर्ज दाखल केला आहे. पुरेसे एतच् उपलब्ध नाहीत, बोर्ड परीक्षांमुळे, शाळेचे परिसर उपलब्ध राहणार नाहीत, राज्य निवडणूक आयोग आवश्यक कर्मचारी/अधिकारी मागवू शकले नाही. आम्हाला असे निरीक्षण करावे लागत आहे की, राज्य निवडणूक आयोग हे न्यायालयाच्या निर्देशांचे पालन करण्यास, निर्धारित वेळेत त्वरित कारवाई करण्यात अयशस्वी ठरले आहे'.

## अतिवृष्टीने नुकसान

असून त्यामुळे व अतिवृष्टीमुळे विशेषता बीड शहराच्या मोमीनपुरा परिसर, खासबाग परिसर , बालेपिर बांगरणाला परिसर, लेंडी नाला परिसर, सेंटर नाला इत्यादी भागात मोठ्या प्रमाणात घरांमध्ये दुकानांमध्ये पाणी शिरलेले आहे त्यामुळे मोठ्या प्रमाणात नागरिकांचे व्यवसायिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झालेले आहे यामध्ये अनेक पशुधन मृत्युमुखी पडल्याचे दिसत आहे या भागातील अनेक घरांची पडझड झालेली असून शासनाने याचे त्वरित पंचनामे करून संबंधितांना मोबदला व आर्थिक मदत करण्यात यावी अशी विनंती महाराष्ट्र राज्याचे लोकप्रिय उपमुख्यमंत्री मा. ना. अजित दादा पवार साहेब यांच्याकडे केलेली असून शासनातर्फे भरीव मदत बिंदुसरा नदीच्या पुराच्या पाण्यामुळे व झालेल्या अतिवृष्टीमुळे बाधित झालेल्या नागरिकांना मिळणार आहे असे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे शेख निजाम,शेख अमर, खय्युम इनामदार,मोमीन जुबेर, सय्यद आजम,शेख हमीद,शेख नसिर,शेख सत्तार इनामदार, शेख खदीर,शेख फारूक,शेख जाकीर यांनी निवेदनात म्हटले आहे

## ऐतिहासिक दसरा

तापले आहे. एका मुस्लिम महिलेच्या हातून महोत्सवाचे उद्घाटन नको, अशी मागणी करणारी याचिका हायकोर्टात दाखल करण्यात आली होती. ती याचिका कोर्टाने फेटाळली.

कर्नाटक हायकोर्टाने आज याबाबतचा निकाल दिला आहे. त्यामुळे बानू मुश्ताक यांच्या हस्तेच ऐतिहासिक दसरा महोत्सवाचे उद्घाटन करण्याचा मार्ग मोकळ झाला आहे. कोणत्याही अन्य धर्मातील व्यक्तीला उद्घाटनासाठी आमंत्रित केल्यामुळे याचिकाकर्त्यांच्या संविधानिक किंवा कायदेशीर अधिकारांचे उल्लंघन होते, याबाबत कोणतेही कारण आढळून आले नाही, असे हायकोर्टाने ही याचिका फेटाळताना म्हटले.

बानू मुश्ताक या आंतरराष्ट्रीय बुकर पुरस्ताक विजेत्या लेखिका आहे. म्हैसूर दसरा महोत्सवाच्या उद्घाटनासाठी कर्नाटक सरकारने त्यांना आमंत्रित केले आहे. त्याला भाजपसह हिंदुत्ववादी संघटनांनी जोरदार विरोध केला आहे. बानू मुश्ताक यांच्या हस्ते २२ सप्टेंबरला महोत्सवाचे उद्घाटन होणार आहे.  दसरा महोत्सव कोणत्याही एका धर्माशी संबंधित नाही. सर्व धर्मीय लोक या महोत्सवात सहभागी होतात. हा सांस्कृतिक आणि राजकीय उत्सव आहे, असे मुख्यमंत्री सिध्दरामय्या यांनी यापूर्वीच स्पष्ट केले आहे. मात्र, भाजपच्या नेत्यांकडून त्याला कडाडून विरोध केला जात आहे. दसरा महोत्सव हा धर्मनिरपेक्ष महोत्सव नाही. हा धार्मिक महोत्सव आहे. दसरा हा आमच्या धर्माचा उत्सव आहे. त्यामुळे त्यासाठी मुस्लिम व्यक्ती नको, अशी भूमिका भाजप नेते प्रताप सिन्हा यांनी घेतली आहे.

याचिकाकर्त्यांकडूनही हायकोर्टात हा मुद्दा उपस्थित करण्यात आला होता. दसरा महोत्सवाच्या उद्घाटनाला हिंदू परंपरेतील एक अविभाज्य अंग म्हणून घोषित करावे आणि हिंदू परंपरांनुसार केवळ हिंदू व्यक्तीद्वारेच उद्घाटन व्हावे, अशी मागणी याचिकेत करण्यात आली होती. पण हायकोर्टाने ही याचिका फेटाळून लावली आहे. त्यामुळे आता बानू मुश्ताक यांच्या हस्तेच उद्घाटन होणार, हे स्पष्ट झाले आहे.बानू मुश्ताक यांचा जन्म १९४८ मध्ये कर्नाटकातील हसनमध्ये झाला. तिथेच त्यांचे शिक्षणही झाले. वयाच्या आठव्या वर्षी त्यांनी कन्नड माध्यम कॉन्व्हेन्ट शाळेत प्रवेश घेतला होता. कन्नड भाषेवर प्रभुत्व प्राप्त झाल्यानंतर त्यांना लेखनाचीही आवड निर्माण झाली. लहान असतानाच लग्न करण्यासाठी त्यांच्यावर दबाव होता. पण हा दबाव जुगारून त्यांनी लेखन सुरूच ठेवले. वयाच्या २६ व्या वर्षी त्यांनी लग्न केले. तर वयाच्या २७ व्या वर्षी त्यांची पहिली लघुकथा प्रकाशित झाली. यावर्षी त्यांना बुकर पुरस्कार प्राप्त झाला आहे.

## मराठवाडा विरोधी

होऊन काहीतरी पदरात पडते, पण आता ती ही शक्यता मावळली आहे.निजामी राजवटीविरोधात लढणाऱ्या मराठवाड्यातील जनतेला स्वातंत्र्यानंतर मात्र आपल्या सरकारविरोधात लढण्याची वेळ आली आहे की काय? अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. यंदा छत्रपती संभाजीनगरमध्ये मराठवाडा मुक्तीसंग्राम दिनाच्या निमित्ताने होणारी दोन दिवसीय मंत्रिमंडळ बैठक होणार नाही. याबद्दल शिवसेना नेते अंबादास दानवे यांनी संताप व्यक्त केला.

आताचे राज्य सरकार मराठवाड्याच्या जनतेविरुद्ध असून मागील दोन वर्षी पूर्वी संभाजीनगरात झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आलेल्या निर्णयांना वाटाण्याच्या अक्षता दाखविण्यात आल्या आहेत. मराठवाडा मुक्तीसंग्राम दिनानिमित्त १६ सप्टेंबर २०२३ रोजी संभाजीनगरात राज्य सरकारने मराठवाड्याचे मागासलेपण दूर करण्याच्या हेतूने मंत्रिमंडळ बैठक घेतली होती. या बैठकीत तब्बल १०० पेक्षा अधिक घोषणा व २० निर्णय घेतले होते.मराठवाड्यातील विकास कामांसाठी एकूण ३७ हजार १६ कोटी रुपयांच्या घोषणा करण्यात आल्या होत्या. तसेच ९ हजार ६७ कोटी ९० लाख खर्चाचे निर्णय घेण्यात आले होते. दोन वर्षांनंतर या बैठकीत घेण्यात आलेल्या निर्णयाकडे पाहिले असता राज्य शासनाने मराठवाड्याचे मागासलेपण दूर करण्याची केलेली घोषणा हवेतच विरून गेली आहे. एकाही विकासात्मक कामाला अद्यापपर्यंत मुहर्त लागत नसल्याचे अंबादास दानवे म्हणाले.

दुष्काळग्रस्त मराठवाड्याच्या पाणी प्रश्न सोडविण्यासाठी मुख्यमंत्र्यांनी पश्चिम वाहिनी नद्यांचे पाणी मराठवाड्यात वळविण्यासाठी तब्बल १४ हजार ४० कोटींची स्वतंत्र तरतूद करण्याचा निर्णय घेतला होता. दोन वर्षांमध्ये सदरील प्रकल्पांच्या विकासासाठी १ हजार १८ कोटी रुपये मंजूर करण्यात आले आहे. राज्य सरकार हे प्रकल्प बनविण्यासाठी या प्रकारच्या संथ गतीने गेल्यास पुढील २० वर्षेही प्रकल्प पूर्ण होणार नाही.

मराठवाड्यातील रस्त्यांचा प्रश्न सोडविण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभाग अंतर्गत आगामी काळात १२ हजार ९३८ कोटी रुपयांचे कामे राज्य शासन हाती घेणार असल्याची घोषणा मुख्यमंत्र्यांनी मंत्रिमंडळ बैठकीत केली होती. मात्र अद्यापपर्यंत फक्त ३०४ कोटी रुपयांच्या विकास कामांना मंजूरी मिळाली असून हायब्रीड अन्युटी योजने अंतर्गत तयार करण्यात येणाऱ्या रस्त्यांचे धोरण बदलल्यामुळे हे रस्ते पूर्ण होणार की नाही? अशी शंका दानवे यांनी व्यक्त केली.जालना जिल्ह्यातील बदनापूर तालुक्यातील धोपटेश्वर येथील दगडाबाई शेळके यांनी मराठवाडा मुक्ती संग्रामात सहभाग घेतला असल्याने राज्य सरकारच्या वतीने त्यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ ५ कोटी रुपये खर्च करून स्मारक बांधणार असल्याची घोषणा मुख्यमंत्र्यांनी केली होती. परंतु आज रोजी या स्मारकाच्या घोषणेची सद्यस्थिती पाहता पंचायत समिती गटशिक्षणाधिकारी यांनी २८ ऑगस्ट २०२४ रोजी जालना जिल्हा परिषद शिक्षणाधिकारी यांच्याकडे जमिनीची मागणी केली आहे. मराठवाड्याची राणी लक्ष्मीबाई म्हणून ओळख असणाऱ्या या स्वातंत्र्य सेनानी यांच्या स्मारकाच्या घोषणाकडे असे शासन दुर्लक्ष करत असेल तर सर्व स्वातंत्र्य सैनिकांचा हा अपमान नाही का?